ग्राम पंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडा सन २०२४-२५ तयार करण्याबाबत व सबकी योजना, सबका विकास मोहिम राबविणेच्या अनुषंगाने

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जीपीडीपी-२०२३/प्र.क्र.१२३ /पंरा- ६**
**बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ**
मुंबई ४०० ००१
तारीखः ९ ऑगस्ट,२०२३.

**<u>प्रस्तावना</u>**

सन २०२४-२५ या वर्षाचे पंचायत राज संस्थांचे तिन्ही स्तरावरील विकास आराखडे तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर आराखडे तयार करण्यासाठी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत लोकप्रतिनिधी व अधिकारी/कर्मचारी यांची क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे विविध स्तरावरील प्रशिक्षण उपक्रम मंजूर करण्यात आलेले आहेत. या सर्व उपक्रमांचे जिल्हानिहाय उद्धिष्ट शासन पत्र क्र. राग्रास्वअ २०२३/प्र.क्र.१२/आस्था-१५,दि.२४ मे, २०२३ अन्वये सर्व जिल्ह्यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच त्यासाठी आवश्यक निधी मर्यादा राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान यांचे दि. १८ जुलै, २०२३ अन्वये सर्व जिल्ह्यांना मंजूर करण्यात आलेली आहे. सन २०२४-२५ या वर्षाचे ग्राम पंचायत , पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत व प्रशिक्षण उपक्रम अंमलबजावणीबाबत यापूर्वी देण्यात आलेल्या खालील प्रमुख सूचनांकडे पुन:श्च लक्ष वेधण्यात येत आहे. याअनुषंगाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक</u>**

अ) संकल्पनाधारीत ग्राम पंचायत विकास आराखडा ( Thematic GPDP)

१. संकल्पनाधारीत ग्राम पंचायत विकास आराखडा ( Thematic GPDP) तयार करणेबाबत शासनाच्या.क्र. जीपीडीपी-२०२२/प्र.क्र.२३५/परा-६,दिनांक २९ नोव्हेंबर २०२२ व पत्र क्र.जीपीडीपी-२०२२/ प्र.क्र.२३६/ परा-६, दि.११ जानेवारी, २०२३ च्या पत्रांन्वये दिलेल्या कार्यपद्धतीचे तंतोतंत पालन करावयाचे आहे.

२. शासनाच्या दिनांक- २९ नोव्हेंबर २०२२ व ११ जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक ग्राम पंचायतीने संकल्पनाधारीत ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी दोन ग्रामसभा घ्यावयाच्या आहेत. या दोन्ही ग्रामसभांचे वेळापत्रक Vibrant Gram Sabha पोर्टलवर भरणे बंधनकारक आहे. ग्राम सभांच्या वेळापत्रकास स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त प्रसिद्धी द्यावी.

३. पहिल्या ग्राम सभेपूर्वी ग्रामपंचायतीने महिला सभा, वॉर्ड सभा, बाल सभा व वंचित घटकांची सभा या चार सभा घ्यावयाच्या आहेत. या चारही सभांमधून खालील विषयांची माहिती देण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner

३.१. सन २०२३-२४ या वर्षाचा आराखडा- भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल

३.२. सन २०२४-२५ या वर्षाच्या आराखड्यासाठी ग्रामसभेने निवडलेल्या संकल्पना व त्या संकल्पने अंतर्गत ई-ग्राम स्वराज पोर्टलवर नमूद उपक्रमांची यादी.

३.३. सन २०२४-२५ या वर्षाच्या आराखड्याच्या नियोजनासाठी उपलब्ध होणारा एकूण निधी. (वित्त आयोग, स्वनिधी, मग्रारोहयो, जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन, ५ % ग्रामकोष निधी, लोकवर्गणी इ.)

३.४. पंधराव्या वित्त आयोगाच्या ६०% बंधित निधीमधून घ्यावयाचे उपक्रम.

३.५. पंधराव्या वित्त आयोगाच्या ४०% अबंधीत निधीमधून ५०% ( एकूण निधीच्या २०%) निधीची तरतूद निवडलेल्या संकल्पने अंतर्गत, ई-ग्राम स्वराज पोर्टलवर नमूद उपक्रमापैकी ५०% उपक्रमांवर करणेबाबत माहिती.

३.६.ग्राम पंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये राज्य व केंद्र शासनाच्या प्रमुख (Flagship) योजना,कार्यक्रमांची माहिती.

३.७. गाव गरिबी निर्मुलन आराखडा

३.८. मिशन अंत्योदय सर्व्हेक्षण अहवाल.

४. पहिली ग्राम सभा - वर नमूद केल्याप्रमाणे चारही सभा झाल्यानंतर ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी पहिली ग्राम सभा आयोजित करावयाची आहे. या सभेमध्ये वर नमूद ३.१ ते ३.८ या विषयासोबत खालील विषय ठेवावेत.

३.९. महिला, वॉर्ड, बाल व वंचित घटकांच्या सभेमधील ठराव व शिफारशी.

३.१०. शाळा विकास आराखडा ( प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकानी वाचून दाखवावा)

३.११. अंगणवाडी अहवाल ( अंगणवाडी सेविकेने वाचून दाखवावा)

३.१२. प्रारूप ग्राम पंचायत विकास आराखड्यास मान्यता देणे.

याप्रमाणे विषय पत्रिका मुख्य कार्यकारी अधिकारी व गट विकास अधिकारी यांनी निश्चित करून सर्व ग्राम पंचायातींना सूचना द्याव्यात. तसेच या विषयपत्रिकेप्रमाणेच ग्रामपंचायतीने ग्रामसभा कार्यवृत्तांत नोंद नोंदवहीत नोंदवावा.

५. तालुका तांत्रिक छाननी समिती - गट विकास अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व ग्राम पंचायतींचे प्रारूप ग्राम पंचायत विकास आराखडे व प्रकल्प अहवाल मुदतीत प्राप्त करून घ्यावेत. तालुका तांत्रिक छाननी समितीने तीन दिवसामध्ये छाननी करून प्रारूप आराखडा त्यांच्या सहमतीसह किंवा त्रुटी नमूद करून, संबधित ग्रामपंचायतीकडे पाठवावा.

तालुका तांत्रिक छाननी समितीने छाननी करताना पंधरावा वित्त आयोगाच्या बंधित व अबंधित निधीचे नियोजन, ग्रामसभेने निवडलेल्या संकल्पना व त्यावरील तरतूद, स्व:निधी व इतर निधीमधून केलेल्या तरतुदी आणि केंद्र व राज्य शासनाच्या प्रमुख (Flagship) योजनांची माहिती इ. बाबींची तपासणी व यापूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छाननी करावी.

६. तालुका तांत्रिक छाननी समितीकडून छाननी करून प्राप्त प्रारूप आराखड्यास दुस-या ग्रामसभेमध्ये अंतिम मान्यता घ्यावी.



Scanned with OKEN Scanner

८. दुस-या ग्रामसभेमध्ये मंजूर केलेला ग्राम पंचायत विकास आराखडा ई-ग्रामस्वराज पोर्टलवर अपलोड करावा.

९. शासन पत्र क्र.जीपीडीपी-२०२३/प्र.क्र.४४/परा-६, दिनांक- ०३ एप्रिल, २०२३ अन्वये सूचना दिल्याप्रमाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यात येणा-या सर्व केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती त्यांची ग्रामसभा व इतर सभा होण्यापूर्वी उपलब्ध होईल याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी.

१०. संबधित ग्रामपंचायतीने आराखडा ई-ग्रामस्वराज पोर्टलवर अपलोड केल्यानंतर संबधित गणाचे विस्तार अधिकारी / पर्यवेक्षिका याना शासन पत्र क्र. राग्रास्वअ २०२२/ प्र.क्र.४९/ आस्था-१५, दिनांक- १३ जुलै, २०२२ नुसार देय असलेली Hand Holding Support ची रक्कम अदा करावी.

ब) पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडा :

राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषद व पंचायत समितीने सन २०२४-२५ या वर्षाचा विकास आराखडा तयार करावयाचा आहे. पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडा तयार करण्याची सविस्तर प्रक्रिया शासन निर्णय क्र. बीपीडीपी-२०२१/प्र.क्र.२१/पंरा-६,दिनांक- १ नोव्हेंबर, २०२१ मध्ये नमूद केलेली आहे. त्यानुसार विहित मुदतीत पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करून ई-ग्रामस्वराज पोर्टलवर अपलोड करावेत.

१. प्रत्येक जिल्हा परिषद व पंचायत समितीने अनुक्रमे जिल्हा परिषद नियोजन समिती व पंचायत समिती नियोजन समिती आणि क्षेत्रीय कार्यकारी गटांची स्थापना करावयाची असून, ज्यांनी अद्यापी या समित्यांची/गटांची स्थापना केलेली नाही त्यांनी ती तात्काळ करावी. ज्या ठिकाणी प्रशासक आहेत, त्या ठिकाणी विविध क्षेत्रातील अधिकारी, तज्ञ व्यक्तींचा समावेश करून नियोजन समितीची आणि क्षेत्रीय कार्यकारी गटांची स्थापना करावी.

२. ज्या ठिकाणी प्रशासक आहेत, अशा ठिकाणी निवडणुकीनंतर आवश्यकता भासल्यास,नवीन सदस्यांच्या सहमतीने व शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा परिषद आराखड्यामध्ये विभागीय आयुक्त यांच्या मान्यतेने व पंचायत समितीच्या आराखड्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने बदल करता येतील .

३. पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करताना पंधराव्या वित्त आयोगाच्या ६०% बंधित व ४० % अबंधित निधीचे निकष तसेच इतर निधीच्या बाबतीत त्या त्या निधी स्रोताचे निकष व मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

४. मंजूर पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे ई-ग्रामस्वराज पोर्टलवर अपलोड करताना, पोर्टल वर संकल्पना निहाय (Themewise) दर्शविण्यात आलेल्या उपक्रमानुसारच अपलोड करावयाचे आहेत.

क ) क्षमता बांधणी व प्रशिक्षण :

ग्रामपंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखड्या विषयीचे क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे जिल्हा निहाय उद्दिष्ट शासनाकडील पत्र क्र. राग्रास्वअ २०२३/प्र.क्र.१२/आस्था-१५, दिनांक-२४ मे, २०२३ अन्वये कळविण्यात आलेले आहे.



Scanned with OKEN Scanner

१. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचना शासन पत्र क्र. राग्रास्वअ २०२२/प्र.क्र.४९/आस्था-१५, दि.१३ जुलै, २०२२ व शासनाकडील पत्र क्र. राग्रास्वअ २०२३/प्र.क्र.१२/आस्था-१५, दिनांक-२४ मे, २०२३ अन्वये दिलेल्या आहेत. प्रशिक्षण दर्जेदार होण्यासाठी सदर सूचनांची अंमलबजावणी करावी.

२. GPDP/BPDP/DPDP प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा परिषदेने आयोजित करावयाचे आहेत. त्यासाठी प्रशिक्षणास आवश्यक सर्व सोई-सुविधा, व्यवस्था, योग्य वातावरण उपलब्ध असलेल्या ठिकाणाची निवड करावी.

३. प्रत्येक प्रशिक्षण उपक्रम, त्यासाठी प्रशिक्षित असलेल्या प्रविण प्रशिक्षकामार्फतच घेण्यात यावेत.

४. सर्व प्रशिक्षण उपक्रम राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा,पुणे यांनी निश्चित केलेल्या प्रशिक्षण मोड्यूल, सादरीकरणाप्रमाणेच पूर्ण करावयाचे असून, यशदाने उपलब्ध करून दिलेले वाचन साहित्य छापून बांधीव / पुस्तिकेच्या स्वरुपात सर्व प्रशिक्षणार्थीना द्यावे.

५. एका प्रशिक्षण वर्गामध्ये ४० ते ५० प्रशिक्षणार्थी असावेत. जास्त प्रशिक्षणार्थी असल्यास एका पेक्षा जास्त वर्गामध्ये प्रशिक्षण आयोजित करावे.

६. प्रशिक्षण कार्यक्रम विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने जिल्हा/तालुक्यामध्ये एकाच वेळी एका पेक्षा जास्त ठिकाणी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करावेत.

७. प्रशिक्षण कार्यक्रमांचे वेळापत्रक तयार करून ते Training Management Portal (TMP) वर भरावे, तसेच राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्षास सादर करावे. तसेच TMP पोर्टल वरील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्वीची व नंतरची सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी.

ड) सबकी योजना, सबका विकास मोहिम (PPC)

ग्रामपंचायत,पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करण्याची प्रक्रिया मोहीम स्वरुपात कालबध्द पद्धतीने राबवावयाची आहे. सन २०२४-२५ या वर्षाचे विकास आराखडे तयार करण्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र | बाब | कालमर्यादा | जबाबदार अधिकारी |
|---|---|---|---|
| ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) | | | |
| १ | जिल्हा परिषद व राज्य शासनाच्या जिल्हा पातळीवरील विभाग प्रमुखांची बैठक घेऊन सूचना देणे. | दि. १५ ऑगस्ट, २०२३ पूर्वी | १. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद<br>२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद |
| २ | जिल्हा परिषद व राज्य शासनाच्या तालुका पातळीवरील विभाग प्रमुखांची बैठक घेऊन सूचना देणे | दि. १५ ऑगस्ट, २०२३ पूर्वी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| **३** | जिल्हा /तालुका / गण पातळीवरील क्षमता बांधणी व प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे. | दि. ३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत | १. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद<br>२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>३. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर)<br>४. पर्यवेक्षिका (ICDS)<br>५. प्रविण प्रशिक्षक |
| ४ | तालुका पातळीवर सरपंच/ उपसरपंच/ ग्रामसेवक व केंद्र चालक यांची बैठक घेऊन त्यांना ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबत मार्गदर्शन करणे. | दि. १५ ते ३० सप्टेंबर, २०२३ | १. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद<br>२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>३. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर)<br>४. पर्यवेक्षिका (ICDS)<br>५. प्रविण प्रशिक्षक |
| ५ | राज्य व जिल्हा परिषदेच्या विविध विभागांकडून मंजूर कामे / उपक्रमांची ग्रामपंचायत निहाय माहिती उपलब्ध करून घेणे. | दि. ३० सप्टेंबर, २०२३ | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर)<br>३. पर्यवेक्षिका (ICDS) |
| ५ | मिशन अंत्योदय सर्वेक्षण- विभाग /विषय निहाय विश्लेषण अहवाल, गाव गरिबी निर्मूलन आराखडा (VPRP), शाळा विकास आराखडा, गाव पातळीवरील सर्व विभागांची माहिती व योजना यांचा तपशील इ. बाबी ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देणे. | ग्रामपंचायतीच्या महिला, वॉर्ड, बाल व वंचित घटकांच्या सभांपूर्वी ७ दिवस | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर)<br>३. पर्यवेक्षिका (ICDS)<br>४. प्रविण प्रशिक्षक<br>५. ग्रामसेवक<br>६. केंद्र चालक व तालुका व्यवस्थापक (ASSK) |
| ६ | प्रारूप ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करणेपूर्वी प्रभाग (वॉर्ड) सभा, महिला सभा, बाल सभा, वंचित घटकांची सभा आयोजित करणे. | पहिल्या ग्रामसभेपूर्वी (२ ऑक्टोंबर ते ३१ ऑक्टोंबर २०२३) | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य,<br>३. चार्ज ऑफिसर व पर्यवेक्षिका (ICDS) |
| ७ | प्रारूप ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेसाठी पहिल्या ग्रामसभांचे आयोजन करणे व ग्रामसभांचे सविस्तर वेळापत्रक राज्य स्तरावर सादर करणे | २ ऑक्टोंबर ते ३१ ऑक्टोंबर २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद<br>३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>४. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर)<br>५. पर्यवेक्षिका (ICDS)<br>६. प्रविण प्रशिक्षक |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ७. सरपंच व उपसरपंच |
| ८ | मंजूर प्रारूप ग्रामपंचायत विकास आराखडे व उपक्रम निहाय प्रकल्प अहवाल छाननीसाठी तालुका स्तरीय तांत्रिक छाननी समितीकडे सादर करणे. | ग्रामसभेनंतर २ दिवसामध्ये | १. सरपंच, उपसरपंच व ग्रामसेवक<br>२. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर) व पर्यवेक्षिका (ICDS) |
| ९ | तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे प्रारूप आराखडे प्राप्त करून घेणे | ग्रामसभा झाल्यानंतर २ दिवसात आणि ५ नोव्हेंबर २०२३ पूर्वी | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर)<br>३. पर्यवेक्षिका (ICDS) |
| १० | प्रारूप ग्रामपंचायत विकास आराखडा तपासून घेणे व दुरूस्त्या, सुधारणा व सूचनांसह हे आराखडे अंतिम मान्यतेसाठी ग्रामपंचायतीकडे पाठविणे. | आराखडा प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसांमध्ये (अंतिम कालावधी १० नोव्हेंबर २०२३ पर्यंत) | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. विस्तार अधिकारी (चार्ज ऑफिसर) |
| ११ | दुरूस्त्या, सुधारणा व सूचना विचारात घेऊन आराखडे दुरूस्त करणे व अंतिम आराखडे मंजूर करणेसाठी ग्रामसभांचे आयोजन करणे. | ०१ नोव्हेंबर २०२३ ते २० नोव्हेंबर २०२३ | सरपंच, ग्रामसेवक व चार्ज ऑफिसर |
| १२ | ग्रामसभेने अंतिम केलेला ग्रामपंचायत विकास आराखडा ई-ग्राम स्वराज या वेब पोर्टलवर अपलोड करणे. | ३० नोव्हेंबर २०२३ | ग्रामसेवक, चार्ज ऑफिसर, केंद्र चालक, तालुका व्यवस्थापक व जिल्हा व्यवस्थापक (ASSK) |
| १३ | शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायत समिती व जिल्हा परिषद विकास आराखडे तयार करणे व ई-ग्राम स्वराज या वेब पोर्टलवर अपलोड करणे. | १ डिसेंबर २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी<br>३. प्रकल्प संचालक, जि. ग्रा. वि. यं.<br>४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद<br>५. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद<br>१. जिल्हा व्यवस्थापक (ASSK) |
| **पंचायत समिती विकास आराखडा (BPDP) सन २०२४-२५** | | | |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पंचायत समिती नियोजन समितीची स्थापना करणे | १० ऑगस्ट, २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती |
| २ | पंचायत समिती स्तरावरील क्षेत्रीय कार्यकारी गटांची स्थापना करणे | १५ ऑगस्ट, २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती |
| ३ | तालुका स्तरीय प्रशिक्षण पूर्ण करणे | ३० सप्टेंबर, २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं.<br>३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)<br>४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>५. प्रविण प्रशिक्षक |
| ४ | तालुका क्षेत्रीय कार्यकारी गटांचे अहवाल प्राप्त करून घेऊन त्यांचे एकत्रीकरण करणे | १५ नोव्हेंबर, २०२३ | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती |
| ५ | पंचायत समिती प्रारूप विकास आराखड्यास पंचायत समिती नियोजन समितीची मान्यता घेणे. | ३० नोव्हेंबर, २०२३ | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती |
| ६ | पंचायत समिती प्रारूप विकास आराखड्याची तांत्रिक छाननी करणे. | १५ डिसेंबर, २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं. |
| ७ | पंचायत समिती विकास आराखडयास पंचायत समिती सभेची मान्यता घेणे | ३१ डिसेंबर, २०२३ | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती |
| ८ | पंचायत समिती विकास आराखडा ई-ग्राम स्वराज पोर्टलवर अपलोड करणे. | ३१ डिसेंबर, २०२३ | १. गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>२. सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती |
| **जिल्हा परिषद विकास आराखडा ( DPDP) सन २०२४-२५** | | | |
| १ | जिल्हा परिषद नियोजन समितीची स्थापना करणे | १० ऑगस्ट, २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं.<br>३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| २ | जिल्हा परिषद स्तरावरील क्षेत्रीय कार्यकारी गटांची स्थापना करणे | १५ ऑगस्ट, २०२३ | ३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>४. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं. |



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| ३ | जिल्हा स्तरीय प्रशिक्षण पूर्ण करणे | १५ ऑक्टोबर, २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं.<br>३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| ४ | जिल्हा क्षेत्रीय कार्यकारी गटांचे अहवाल प्राप्त करून घेऊन त्यांचे एकत्रीकरण करणे | १५ डिसेंबर, २०२३ | १. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं.<br>२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| ५ | जिल्हा परिषद प्रारूप विकास आराखड्यास पंचायत समिती नियोजन समितीची मान्यता घेणे. | ३१ डिसेंबर, २०२३ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं.<br>३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| ६ | जिल्हा परिषद प्रारूप विकास आराखड्याची तांत्रिक छाननी करणे. | १५ जानेवारी, २०२४ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं. |
| ७ | जिल्हा परिषद विकास आराखडयास जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे | १५ फेब्रुवारी, २०२४ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं.<br>३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| ८ | जिल्हा परिषद विकास आराखडा ई-ग्राम स्वराज पोर्टलवर अपलोड करणे. | २९ फेब्रुवारी, २०२४ | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद<br>२. प्रकल्प संचालक,जि. ग्रा. वि. यं.<br>३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |

वरील प्रमाणे-सबकी योजना, सबका विकास॰ माहिमेंतर्गत कालबध्द कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असून त्यांनी आवश्यक त्या सूचना सर्व संबंधितांना द्याव्यात. या कालबध्द कार्यक्रमाचे सनियंत्रण पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत नियमितपणे विविध पोर्टलच्या माध्यमातून होत असल्याने, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वैयक्तिक लक्ष देऊन या मोहिमेंतर्गत विविध उपक्रमांची कालबध्द अंमलबजावणी करावी, ही विनंती.



Scanned with OKEN Scanner

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८१०१२५३१३४३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

VARSHA MUNJA BHAROSE

Digitally signed by VARSHA MUNJA BHAROSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1BD844032884BBF2167BC99CD85325223ACEEF69D02BD455B7CA6972491623E0, cn=VARSHA MUNJA BHAROSE
Date: 2023.08.10 17:47:21 +05'30'

**(व. मुं.भरोसे)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक,
२. सर्व विभागीय आयुक्त,
३. सर्व जिल्हाधिकारी,
४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
५. सर्व गट विकास अधिकारी,
६. निवडनस्ती (कार्यासन पं.रा-६)



Scanned with OKEN Scanner